॥ हात तुझा हातातुन ॥

गायिकाः अनुराधा पौडवाल
गायकः अरुण दाते
गीतः मंगेश पाडगांवकर

तोः हात तुझा हातातुन धुंद ही हवा
तीः रोजचाच चंद्र आज भासतो नवा ॥ धृ. ॥

तोः रोजचेच हे वारे, रोजचेच तारे
भासते परी नवीन विश्व आज सारे
तीः ही किमया स्पर्शाची भारिते जिवा
हात तुझा हातातुन धुंद ही हवा ॥ १ ॥

तीः या हळव्या पाण्यावर मोहरल्या छाया
मोहरले हृदय तसे मोहरली काया
तोः चांदण्यात थरथरतो मधुर गारवा
हात तुझा हातातुन धुन द ही हवा ॥ २ ॥

तोः जन्म जन्म दुर्मिळ हा क्षण असला येतो
स्वप्नांच्या वाटेने चांदण्यात नेतो
तीः बिलगताच जाईचा उमलतो थवा
हात तुझा हातातुन धुंद ही हवा ॥ ३ ॥

तीः क्षणभर मिटले डोळे, सुख न मला साहे
विरघळून चंद्र आज रक्तातून वाहे
तोः आज फुले प्राणातुन केशरी दिवा
दोघेः हात तुझा हातातुन धुंद ही हवा
रोजचाच चंद्र आज भासतो नवा ॥ ४ ॥